RNI No. MAHBIL/2009/35530

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार

वर्ष ३, अंक ८] गुरुवार, जानेवारी १२, २०१७/पौष २२, शके १९३८ [पृष्ठे ३ किंमत : रुपये २३.००

असाधारण क्रमांक १२

प्राधिकृत प्रकाशन

महाराष्ट्र विधानमंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रख्यापित केलेले अध्यादेश व केलेले विनियम.

अनुक्रमणिका

| | |
|---|---|
| सन २०१७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ७.—महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन (विकास व विनियमन) अधिनियम, १९६३ यात आणखी सुधारणा करण्यासाठी अधिनियम. | पृष्ठे १-३ |

दिनांक ११ जानेवारी २०१७ रोजी मा. राज्यपालांनी संमती दिलेला महाराष्ट्र विधानमंडळाचा पुढील अधिनियम माहितीसाठी, याद्वारे, प्रसिद्ध करण्यात येत आहे.

प्रकाश हिं. माळी,
प्रधान सचिव,
महाराष्ट्र शासन,
विधि व न्याय विभाग.

---

सन २०१७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ७.

(मा. राज्यपालांची संमती मिळाल्यानंतर "महाराष्ट्र शासन राजपत्रात" दिनांक १२ जानेवारी २०१७ रोजी प्रथम प्रसिद्ध केलेला अधिनियम.)

महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन (विकास व विनियमन) अधिनियम, १९६३ यात आणखी सुधारणा करण्यासाठी अधिनियम.

२०१६ चा महा. अध्या. २०. ज्याअर्थी, महाराष्ट्राच्या राज्यपालांनी महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन (विकास व विनियमन) (सुधारणा) अध्यादेश, २०१६ हा दिनांक ५ जुलै २०१६ रोजी प्रख्यापित केला होता ;

आणि ज्याअर्थी, दिनांक १८ जुलै २०१६ रोजी राज्य विधानमंडळाचे अधिवेशन पुन्हा सुरू झाल्यावर, उक्त अध्यादेशाचे राज्य विधानमंडळाच्या अधिनियमात रूपांतर करण्यासाठी महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन (विकास व विनियमन) (सुधारणा) विधेयक, २०१६ (सन २०१६ चे विधानसभा विधेयक क्रमांक २४) हे महाराष्ट्र विधानसभेने दिनांक ३ ऑगस्ट २०१६ रोजी संमत केले होते आणि महाराष्ट्र विधानपरिषदेकडे ते पारेषित करण्यात आले होते ;



1/3

आणि ज्याअर्थी, त्यानंतर महाराष्ट्र विधानपरिषदेचे दिनांक ५ ऑगस्ट २०१६ रोजी सत्र समाप्ती झाल्यामुळे महाराष्ट्र विधानपरिषदेत उक्त विधेयक संमत होऊ शकले नाही ;

आणि ज्याअर्थी, राज्य विधानमंडळाचे अधिवेशन पुन्हा सुरू झाल्याच्या दिनांकापासून सहा आठवड्यानंतर म्हणजेच २८ ऑगस्ट २०१६ या दिनांकानंतर, भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद २१३ (२)(क) अन्वये तरतूद केल्याप्रमाणे उक्त अध्यादेश अंमलात असण्याचे बंद झाले होते ;

आणि ज्याअर्थी, राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांचे अधिवेशन चालू नव्हते आणि यात यापुढे दिलेल्या प्रयोजनांकरिता, उक्त अध्यादेशाच्या तरतुदी अंमलात असण्याचे चालू ठेवण्यासाठी महाराष्ट्राच्या राज्यपालांनी तात्काळ कार्यवाही करणे आवश्यक व्हावे अशी परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल त्यांची खात्री पटली होती, आणि, म्हणून, त्यांनी दिनांक ३० ऑगस्ट २०१६ रोजी महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन (विकास व विनियमन) (दुसरी सुधारणा व पुढे चालू ठेवणे) अध्यादेश, २०१६ (यात यापुढे ज्याचा निर्देश " पुढे चालू ठेवणे अध्यादेश " असा करण्यात आला आहे) हा प्रख्यापित केला होता ; २०१६ चा महा. अध्या. २०.

आणि ज्याअर्थी, उक्त पुढे चालू ठेवणे अध्यादेशाचे राज्य विधानमंडळाच्या अधिनियमात रूपांतर करणे इष्ट आहे ; त्याअर्थी, भारतीय गणराज्याच्या सदुसष्टाव्या वर्षी, याद्वारे, पुढील अधिनियम करण्यात येत आहे :–

संक्षिप्त नाव व प्रारंभ.

१. (१) या अधिनियमास, महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन (विकास व विनियमन) (सुधारणा) अधिनियम, २०१६, असे म्हणावे.

(२) तो, दिनांक ५ जुलै २०१६ रोजी अंमलात आला असल्याचे मानण्यात येईल.

सन १९६४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २० याच्या कलम २ ची सुधारणा.

२. महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन (विकास व विनियमन) अधिनियम, १९६३ (यात यापुढे ज्याचा निर्देश " मुख्य अधिनियम " असा करण्यात आला आहे), याच्या कलम २ मधील, पोट-कलम (१) मध्ये,— १९६४ चा महा. २०.

(क) खंड (फ-१अ) नंतर, पुढील खंड समाविष्ट करण्यात येईल :–

" (फ-१ब) " ई-पणन" याचा अर्थ, आनुषंगिक कार्यांसह कृषि उत्पन्नाचे इलेक्ट्रॉनिक प्रणालीद्वारे पणन, असा आहे ;";

(ख) खंड (ह) मध्ये, " या अधिनियमाच्या " या मजकुरानंतर, " कलम ५ खालील " हा मजकूर समाविष्ट करण्यात येईल.

सन १९६४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २० याच्या कलम ६ ची सुधारणा.

३. मुख्य अधिनियमाच्या कलम ६ मध्ये, पोट-कलम (२) नंतर, पुढील पोट-कलम समाविष्ट करण्यात येईल :—

" (२अ) या अधिनियमात काहीही अंतर्भूत असले तरी, कोणत्याही व्यक्तीस, कलम ५ अन्वये स्थापन केलेल्या बाजाराबाहेर, अनुसूचीतील बाब (सात) फळे आणि (आठ) भाजीपाला यांखालील सर्व नोंदीत, आणि बाब (दहा) व्यंजने, मसाल्याचे व इतर पदार्थ याखालील नोंदी (२), (३), (४) आणि (५) यात विनिर्दिष्ट केलेल्या कृषि उत्पन्नाचे पणन करण्यासाठी, कलम ५ड मध्ये तरतूद केली असेल त्याखेरीज, कोणत्याही लायसनची किंवा परवानगीची आवश्यकता भासणार नाही, आणि अशा पणनाचे बाजार समितीकडून विनियमन केले जाणार नाही.".

सन १९६४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २० याच्या कलम ३१ ची सुधारणा.

४. मुख्य अधिनियमाच्या कलम ३१ मध्ये,–

(क) पोट-कलम (१) मधील, तिसऱ्या परंतुकाऐवजी, पुढील परंतुक दाखल करण्यात येईल :–

" परंतु तसेच, ज्या कृषि उत्पन्नाच्या संबंधात इतर कोणत्याही बाजार समितीने, खाजगी बाजार, शेतकरी-ग्राहक बाजार, विशेष वस्तूंचा बाजार किंवा राज्यातील थेट पणन अंतर्गत या कलमाखालील फी या अगोदरच बसविलेली असेल आणि ती वसूल केलेली असेल अशा कृषि उत्पन्नाच्या संबंधात, किंवा कोणत्याही बाजार क्षेत्रात कोणतीही यंत्रसामग्री किंवा कामगार यांच्या मदतीविना चालविण्यात येणाऱ्या उद्योगामध्ये गुंतलेल्या व्यक्तींनी खरेदी केलेल्या घोषित कृषि उत्पन्नाच्या संबंधात, कोणत्याही बाजार क्षेत्रात अशी कोणतीही फी बसविता येणार नाही आणि ती वसूल करण्यात येणार नाही.";

(ख) पोट-कलम (२) मध्ये, " अडत्यांनी " या मजकुराऐवजी, " खरेदीदारांकडून अडत्यांनी " हा मजकूर दाखल करण्यात येईल.

2/3

२०१६ चा महा. अध्या. २०. ५. (१) महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन (विकास व विनियमन) (दुसरी सुधारणा व पुढे चालू ठेवणे) अध्यादेश, २०१६, हा, याद्वारे, निरसित करण्यात येत आहे. सन २०१६ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक २० याचे निरसन व व्यावृत्ती.

(२) असे निरसन झाले असले तरी, उक्त अध्यादेशाद्वारे सुधारणा करण्यात आलेल्या मुख्य अधिनियमान्वये करण्यात आलेली कोणतीही कृती किंवा कार्यवाही (काढण्यात आलेली कोणतीही अधिसूचना किंवा दिलेला आदेश यांसह) ही, या अधिनियमाद्वारे सुधारणा करण्यात आलेल्या मुख्य अधिनियमाच्या संबंधित तरतुदींन्वये करण्यात आलेली कोणतीही कृती, कार्यवाही किंवा यथास्थिति, काढण्यात आलेली कोणतीही अधिसूचना किंवा काढण्यात आलेला आदेश असल्याचे मानण्यात येईल.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400004. EDITOR : SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI.

3/3